महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ

शासकीय तंत्र निकेतन इमारत, क विभाग,दुसरा मजला,
४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

दुरध्वनी व फॅक्स क्र.२६४७ ४४ ३५ www.msbve.gov.in Email : chairman-msbve@nic.in

जा.क्र.मराव्यशिपमं/का-०४/परीक्षा/एप्रिल-१८/२०१७/ १८६५ दिनांक :- १४ / १२/२०१७

प्रति,

जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण
अधिकारी कार्यालय, (सर्व).

विषय - वार्षिक परीक्षा एप्रिल २०१८ - दोन वर्ष कालावधी अभ्यासक्रमांस प्रविष्ठ विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क भरणेबाबत... (प्रवेश सत्र १ जुलै २०१६ ते ३० एप्रिल २०१८)

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्र. मराव्यशिपमं/का-०४/प्र.का.२०१७-१८/मुदतवाढ/२०१७/१३५५, दि. ०७.०९.२०१७

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, १ जुलै २०१६ ते ३० एप्रिल २०१८ या प्रवेश सत्रात दोन वर्ष कालावधी अभ्यासक्रमांस प्रवेशित विद्यार्थ्यांची परीक्षा माहे एप्रिल २०१८ मध्ये घेण्यात येणार आहे.

वरील संदर्भिय प्रवेश सत्रातील अभ्यासक्रमांस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांकडून केवळ नोंदणी शुल्क घेणेबाबत सूचना देण्यात आलेल्या होत्या. तरी एप्रिल २०१८ मध्ये परीक्षेस बसणाऱ्या दोन वर्ष कालावधी अभ्यासक्रमांस प्रविष्ठ विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क स्वीकारण्याचा कार्यक्रम खालीलप्रमाणे आयोजित करण्यात येत आहे.

एक वर्ष कालावधी अभ्यासक्रमांची परीक्षा **एप्रिल २०१८ ऐवजी जुलै २०१८** मध्ये घेण्यात येणार असल्याने सदर अभ्यासक्रमांस प्रवेशित विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क स्वीकारण्याचा कार्यक्रम नंतर कळविण्यात येईल.

संस्थेने **शासनाच्या/मंडळाच्या नियमाप्रमाणे प्रशिक्षणार्थ्यांचे अभ्यासक्रम पूर्ण झाल्याचे तसेच परीक्षेस बसणेस आवश्यक ती हजेरी पूर्ण असल्याबाबतचे प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. प्रशिक्षणार्थ्यांची दि. ३१.१२.२०१७ पर्यंत असलेली हजेरी नमूद करावी. प्रशिक्षणार्थ्यांची हजेरी परीक्षेपर्यंत कमीत कमी ७५ टक्के असणे आवश्यक आहे.** संस्थेने असे प्रमाणपत्र दिल्याशिवाय जिल्हा कार्यालयाने नोंदणी रजिस्टर/परीक्षा शुल्क स्वीकारू नये

**परीक्षा शुल्क भरणेबाबतचा नियोजित कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र | नियोजित कार्यक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | मंडळ कार्यालयाने पाठविलेल्या नोंदणी रजिस्टरप्रमाणे --<br>**अ)** संस्थांनी नोंदणी रजिस्टरमध्ये नमूद असलेल्या विद्यार्थ्यांकडून नियमित परीक्षा शुल्क (रू. २००/-) स्वीकारणे.<br>**ब)** संस्थांनी विद्यार्थ्यांकडून स्वीकारलेले परीक्षा शुल्क रू.२००/- एकत्रित करुन मंडळाच्या स्टेट बँक ऑफ इंडिया मधील शाखेत चालू खाते क्र. ३१४८५९९९९५० मध्ये चलनाव्दारे भरण्यात यावे.<br>यापूर्वीच परीक्षा शुल्क मंडळाच्या खाती जमा केले असल्यास त्याबाबतचे अभिलेख सादर करणे. | दि. ०५/०१/२०१८ पर्यंत |
| २ | **अ)** संस्थेने नोंदणी रजिस्टरची प्रत, परीक्षा शुल्क बँकेत भरलेल्या चलनाच्या मूळ प्रती आणि **हजेरी/प्रशिक्षणाबाबतचे प्रमाणपत्र** जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालयात जमा करणे.<br>**ब)** संस्थेने परीक्षा शुल्क भरलेल्या विद्यार्थ्यांचे नोंदणी रजिस्टर व चलनाच्या प्रती स्कॅन करून मंडळाच्या **chairman-msbve@nic.in** या ईमेल ॲड्रेसवर पाठविणे बंधनकारक आहे. | दि. ०५/०१/२०१८ पर्यंत |

| | | |
|---|---|---|
| | **क)** जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांनी परीक्षा शुल्क भरलेल्या विद्यार्थ्यांचे नोंदणी रजिस्टर व चलनाच्या प्रती आणि **हजेरी/प्रशिक्षणाबाबतचे प्रमाणपत्र** यांची तपासणी करणे.<br><br>**ड)** जिल्हा कार्यालयाने पात्र असलेल्या विद्यार्थ्यांच्या मंजूरीची एक प्रत संबधित संस्थेस देण्यात यावी व दुसरी प्रत मंडळास पाठविण्यात यावी.<br><br>**इ) मंडळाच्या नोंदणी रजिस्टरमध्ये नमूद ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्क भरलेले आहे व ज्यांना जिव्यशिप्रअ कार्यालयाने मंजूरी दिलेली आहे केवळ त्याच विद्यार्थ्याचे परीक्षा प्रवेशपत्र निर्गमित केले जातील याची नोंद घ्यावी व सदर बाब संस्थांच्या निदर्शनास आणावी.** | दि. ०५/०१/२०१८<br>पर्यंत |
| ३ | **उशिराने प्राप्त झालेल्या अर्जाचे प्रती विद्यार्थी विलंब शुल्क स्विकारणे :-**<br>**अ) विलंब शुल्क** :- परीक्षा शुल्क रू. २०० + विलंब शुल्क (परीक्षा शुल्काच्या २५%)<br>(नियमित शुल्काच्या दिनांकापासून पुढील १० दिवसांपर्यंत)<br>(रू. २००+ रू. ५० = २५०/-)<br>**ब) अतिविलंब शुल्क** :- परीक्षा शुल्क रू. २०० + अतिविलंब शुल्क<br>(परीक्षा शुल्काच्या १०० %)<br>(विलंब शुल्काच्या दिनांकापासून पुढील १० दिवसांपर्यंत )<br>(रू. २००+ रू. २००/- = ४००/-)<br>**दि. १९/०१/२०१८ नंतर आलेल्या कोणत्याही विद्यार्थ्यांचे शुल्क जिल्हा कार्यालयाने स्विकारू नये. याबाबत कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही व याची जबाबदारी मंडळ कार्यालयाची राहणार नाही.** | दि. ०६/०१/२०१८<br>ते<br>दि. १२/०१/२०१८<br>--------------------<br>दि. १५/०१/२०१८<br>ते<br>दि. १९/०१/२०१८ |
| ४ | जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांनी संबंधित संस्थांच्या प्राप्त झालेल्या नोंदणी रजिस्टरची प्रत, हजेरी/प्रशिक्षणाबाबतचे प्रमाणपत्र व नियमित/विलंब /अतिविलंब परीक्षा शुल्क भरलेल्या चलनाची प्रत मंडळ कार्यालयाकडे सादर करणे. | दि. २५/०१/२०१८<br>पर्यंत |

तरी वरील कार्यक्रमाप्रमाणे कार्यवाही करून विद्यार्थ्यांची माहिती मंडळास पाठविण्यात यावी.

आपला,

(डी. ए. दळवी)
सचिव,
म.रा.व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ,
वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

प्रत :-

१. सहा.सचिव/अधिक्षक, परीक्षा विभाग, कार्यासन क्र. ०६/०७, ०८/०९, व १०/११ यांना माहिती व कार्यवाहीसाठी.
२. संगणक विभाग- सदर पत्र मंडळाच्या वेबसाईटवर अपलोड करावे.
३. निवड नस्ती.